Vol 3 Issue 11 Dec 2013 ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-11, Dec-2013
ISSN 2230-7850
Available online at www.isrj.net

# स्त्रीवादी चळवळीच्या सामाजिक बाजू

**शेख एस.एस , शेख एस.एम.**
(ग्रंथपाल) एस.जी.के.कॉलेज, लोणी काळभोर, पुणे.

***सारांश:***भारतीय समाजामध्ये स्त्रियांना संस्कृती आणि धर्माच्या नावाखाली दडपले गेले आहे. तैतरीय संहिता, मनुस्मृती या ग्रंथा मधून स्त्रीला 'निरिंद्रिय' म्हणण्यात आले आहे. निरिंद्रिय म्हणजे ती अवयवरहित आहे. म्हणजेच जिचा स्वतःच्या अवयवांवर अधिकार नाही. पतीची ज्ञानेंद्रिय हिच तिची ज्ञानेंद्रिय आहेत अशा स्त्रीला निरिंद्रिय म्हटले आहे. उदा. गांधारी. तिने स्वतःची इंद्रिय स्वतंत्रपणे ज्ञान प्राप्तीसाठी वापरायची नाहीत. पतीच्या इंद्रियावर, बुध्दीवपर, विचार पध्दतीवर पुर्ण पणे अवलंबून राहवयाचे असा त्याचा अर्थ होतो.

***प्रस्तावना:—***

विश्वातील प्रत्येक समाज ढोबळमानाने पन्नास टक्के स्त्री व पन्नास टक्के पुरूष घटकांचा मिळूनच बनलेला असतो. समाजामध्ये सामाजिकरण, संस्कृती हस्तांतराचे कार्य स्त्री करीत असते. स्त्री हा समाजाचा आधारभूत घटक आहे, म्हणूनच समाजाच्या कोणत्याही बाजूचे मूल्यमापन स्त्रीची सामाजिक स्थिती, दर्जा, भूमिका या निकशांवरूनच करता येते. समाज परिवर्तनशील असल्याने बदलत्या काळामध्ये स्त्री—पुरूष विषयक नवा विचार नव्या जाणिवा विकसित होण्यास प्रारंभ झाला. जगातील काही प्रगत राष्ट्रांतील स्त्रीयांनी स्त्री स्वातंन्र्यासाठी व आपल्या हक्कांसाठी झगडण्यास सुरूवात केली, यालाच 'स्त्रीवाद' असे म्हणतात. स्त्रीवाद ही प्रामुख्याने पाश्चात्य विचारधारा आहे. कालोघात ती भारतात ही रूढ झाली. भारताच्या इतिहासात काही स्त्रिया आपल्या कर्तुत्वाने चमकताना दिसतात. उदा. झाशीची राणी लक्ष्मीबाई. परंतू तिलाही पुरूषी वेश परिधान करून राज्य कारभार करावा लागला. राणी ताराबाई, अहिल्याबाई होळकर, आनंदीबाई, रजिया सुल्तान या सारख्या कर्तुत्ववान स्त्रिया इतिहासात होऊन गेल्या. याशिवाय संत मिराबाई, संत मुक्ताबाई, संत महदंबा, संत जनाबाई, संत बहिणाबाई यासारख्या मध्ययुगीन भारतातील संत कवयित्रींनी आपल्या काव्यातून, ओव्यातून तत्कालीन स्त्री जीवनाचे दुखःमय व दारूण असे दर्शन घडविले. जनाबाई ह्या शुद्रवर्णातील दासी असलेल्या स्त्रीने, स्त्रियांनी अत्याचार सहन करू नये, दडपणखाली वावरू नये, असे आवाहन केले. त्यामुळे ती क्रांतीकारक कवयित्री म्हणून ओळखली जाते.1882 मध्ये ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री—पुरूष तुलना' हे पुस्तक लिहून कुटुंबात, समाजात स्त्रिला मिळणारी वागणूक दाखवून दिली आहे.

19 व्या शतकाच्या मध्यानंतर भारतातील काही समाजसुधारकांनी स्त्रियांवरील अत्याचाराला, अन्यायाला वाचा फोडण्यास सुरूवात केली. स्त्रियांचा विकास व्हावा, तिला समाजात, कुटुंबात मान/प्रतिष्ठा मिळावी म्हणून सुधारकांनी खूप प्रयत्न केले. आद्यसमाज सुधारक राजराम मोहनरॉय यांनी 1829 मध्ये संतीबंदीची कायदा इंग्रज राजकर्त्यांकडून लागू करून घेतला. महात्मा ज्योतिराव फुले यांनी 1848 मध्ये स्त्रियांसाठी पुण्यात पहिली मुलींची शाळा काढली. पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण देऊन मुलींच्या शाळेत शिक्षिका म्हणून नेमले. तसेच म. धोंडो केशव कर्वे यांनीही स्त्रियांसाठी भारतातील एकमेव महिला विद्यापीठ 1916 साली पुण्यात स्थापन केले. पं. रमाबाईंनी 1889 मध्ये मुंबईला 'शारदा सदनची' स्थापना करून विशेषतः विधवांसाठी शाळा वसतीगृहे सुरू केली. या सर्व समाजसुधारकांना भारतातील आद्य स्त्रीवादी चळवळीचे प्रणेते असे म्हणावे लागेल.

19 वे आणि 20 वे शतक भारतीय समाज जीवनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठरते. 20 व्या शतकात स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भारताने नवतेचा स्वीकार करून आपला स्वतंत्र कारभार सुरू केला. समाज जीवनात नवीन पर्वाला सुरूवात झाली. भारतीय सांस्कृतिक जीवनाचा कायापालट घडून आला. या काळात स्त्रिचे व्यक्तिमत्व बदलून सामाजिक सांस्कृतिक व कौटुंबिक दृष्टीने असणारे अस्तित्व अर्थपूर्ण बनले. 'स्त्री' म्हणून स्त्रीला कोणतेच क्षेत्र वर्ज्य राहिले नाही. उलट समाजाच्या विविध क्षेत्राात कार्य करण्याची क्षमता अनेक स्त्रियांनी सिध्द करून अनेक कर्तुत्वाच्या वाटा खुल्या करून दिल्या. स्त्रीजात केव्हाही श्रेष्ठ आहे, पुरूषांनी त्यांना कमी लेखण्याचा कितीही अट्टाहास केला तरी जगाच्या उध्दाराची गुरूकिल्ली ही अबला समजल्या जाणा—या स्त्रीच्याच हाती आहे. प्रत्यक्ष परमेश्वरानेच स्त्रियांच्या श्रेष्ठत्वाची साक्ष जगाला पटवून दिली आहे.

घटनेने सुध्दा स्त्रियांना समान शिक्षणाचा, मतदानाचा, समान वेतनाचा, समान नोकरी व्यवसाय करण्याचा अधिकार दिलेला आहे. त्यामुळे आजची स्त्री ही अधिक आत्मविश्वासू बनलेली आहे. अधिक स्वतंत्र झालेली आहे. बदलते समाजजीवन, विज्ञानाचा उदय, शिक्षणाने मिळालेला आत्मविश्वास यामुळे स्त्रिया आज आवाज उंचावू लागल्या आहेत. त्याचे मुळ 19 व्या शतकातील सामाजिक चळवळीमध्ये आहे.

20 व्या शतकाच्या मध्यानंतर उदयास आलेल्या व विकसीत होणा—या सामाजिक चळवळींचा आढावा घेतला तर विकसीत व अविकसीत देशांधील स्त्री मुक्ती चळवळीचा वाढता प्रभाव लक्षात येतो. स्त्रियांना 'स्वत्वाची' जाणीव करून देणे हा मुख्य हेतू या चळवळीचा होता. संस्कृतीच्या हजारो वर्षाच्या इतिहासाने स्त्रीचे मानवपण नाकारून तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्तापित करून घेण्यासाठी निर्माण केलेले एक व्यासपीठ आहे.[2] 1904 मध्ये पुणे येथे 'पहिलि महिला परिषद' रमाबाई रानडेंच्या अध्यक्षतेखाली पार पडली. 1926 मध्ये 'अखिल भारतीय महिला परिषदेची श्स्थापना पुणे येथे झाली.

1974 मध्ये 'Indian Council of Scientific Research' या संस्थेत स्त्री अभ्यास विभगाची स्थापना करण्यांत आली व या संस्थेने स्त्री अभ्यासाला चालना दिली.

तसेच ब्रिटिशांच्या राजवटीत स्त्रियांच्या स्थितीत सुधार होण्यासाठी विविध समाजसुधारक व मिशनरीज यांनी प्रयत्न केले. या प्रयत्ना मध्ये स्त्रियांचा सहभाग कमी होता. 1907 साली स्त्री डॉक्टरांनी त्यांची संघअना स्थापन केली. 1923 पासून स्त्री वकिलांना न्यायालयात वकिली करण्याची परवानगी मिळाली. 1917 साली महिला समिती स्थापन झाली व सर्व क्षेत्रात तिचा विकास करण्याचे प्रयत्न सुरू झाले. पुणे, कलकत्ता, मुंबई या ठिकाणी महिला समित्या कार्यरत झाल्या. 1927 साली अखिल भारतीय पातळीवरील स्त्री अधिवेशनात ब्रिटिश शासनामुळे समित्यावरील सर्व निर्बंध दूर करण्यात यावेत यासाठी प्रस्ताव मांडण्यात आला.1960[4] च्या दशकात ज्यावेळी स्त्रिया सर्वक्षेत्रात पुरूषांबरोबर काम, नोकरी करू लागल्या, शिक्षण घेऊ लागल्या. त्यावेळी सर्वक्षेत्रां मध्ये लिंगभेदामुळे मोठया प्रमाणात भेदभाव वाढला व यातूनच श्व्यक्ति स्वातंत्र्य' ही कल्पना उदयास आली. 1975 साली स्त्री दशक जाहीर झाल्यावर स्त्रीवादाची लाट सा—या जगभर पसरत गेली. स्त्रीवाद किंवा स्त्रीमुक्तीवाद म्हणजे खाजगी, सामाजिक, आर्थिक आणि राजकिय पातळीवर होणा—या स्त्रियांच्या दडपणूकी विरोधी झगडण्याची जाणीव निर्मान करणे, दडपणूकी विरोधी झगडण्याची तयारी असणे म्हणजे स्त्रीवादाचा अंगीकार करणे होय. भारतामध्ये सुध्दा स्त्रीमुक्तीवादला सुरूवात झाली. स्त्रीयांना सतत मुख्य प्रवाहातून बाहेर ढकलण्यात आले. समाजात आपल्याला दुय्यम स्थान दिले जाते याची जाणीव स्त्रियांना झाली. लिंगभेदामुळे आणि पितृसत्ताक पध्दतीमुळे स्त्रियांची दुरावस्था होवू लागली. हे स्त्रियांच्या लक्षात आले आणि पाश्चिमात्य देशात ह्या बाबत सुधारणा करण्याची मागणी होवू लागली व लिंगभेदामुळे होणा—या विषमतेला तोंड फोडण्यासाठी स्त्री आंदोलने सुरू झाली. आपल्या स्वार्थसाठी पुरूशाने पिढयानपिढया सेक्स, समाज आणि संस्कृती याच्या दडपणाखाली स्त्रियांना ठेवले. त्यामुळे स्त्रियांना हेच आपले नैसर्गिक जीवन आहे असे वाटू लागले. परंतू याची जाणिव स्त्रियांना झाली. जगाच्या तुलनेत पाहिले तर अमेरिकन स्त्री ही खूप नशिबवान ठरलेली आहे. तरी सुध्दा त्यांना मतदानाचा आणि मिळकतीचा हक्क मिळविण्यासाठी लढा द्यावा लागला. स्त्रियांना त्यांचे स्वातंत्र्य, त्यांचे अधिकार त्यांना मिळावे म्हणून लढा देताना अनेक स्त्री कार्यकर्त्यांना तुरूंगवास व हौतात्म्य पत्करले आहे. उत्क्रांतीच्या टप्यात स्त्रीची मानवी क्षमताच थांबली गेली. स्त्री—पुरूष संबंधातील स्त्रीच्या भूमिकेलाच दुय्यमपणा आला. त्यांच्या मूक हुंदक्यांना शब्दरूप देण्यासाठी त्यांच्या हक्कासाठी झगडणा—या बुध्दीमान स्त्रियांची गरज भासू लागली. मेरी वुलस्टोन काफ्ट ही इंग्लिश तत्त्वज्ञांकडून माणसाच्या हक्कांबाबत जागरूक राहायला शिकली. मार्गारेट फुलरने इमर्सनचे शिष्यत्व पत्करले. इन्स्टॉईन रोजने स्त्रीचे दुय्यमत्व दाखविणा—या धार्मिक तत्त्वांविरूध्द बंड केले.[5] अमेरिकेमध्ये 20 व्या शतकात मोठया संख्येने असलेल्या गृहिणींची समस्या सोडविण्यासाठी 'National Women Organization' ही संस्था स्थापन झाली.

'स्त्रीवादी' विचारसरणीत निश्चितपणे एक राजकीय दिशा असते. स्त्रीवादी शब्दाचा अर्थ काटेकोर पध्दतीने लावला तर स्त्रीवादी चळवळीने समाजाच्या मूलभूत आणि सम्यक परिवर्तनाचाच विडा उचलला पाहिजे. स्त्रीवादाचे स्वरूप तात्वीक असून स्त्रीयांना त्यांचे श्रेय मिळावे. आयझॅक ट्राईव्ह म्हणतात स्त्रीवाद हा तीन विचारांवर आधारीत आहे. 1) मानवाचे हक्क 2) समाजवादी सिध्दांत 3) लिंगभेद दृष्टिकोन इ. विविध वैचारीक छटा असल्या तरी व्यक्तिस्वातंत्र्य स्वतःचे आयुष्य स्वतःला स्वायत्तपणे घडविण्याचा अधिकार या मुळ धारणांवर स्त्री मुक्ती चळवळीचा अधिकर भर आहे. स्त्री—पुरूष लिंगभेद, सामाजिक प्रतिष्ठा, पितृसत्ता पध्दती इत्यादी अनेक गोष्टीकडे आज स्त्रीवादी चळवळ आकृष्ट झाली आहे. स्त्रीवादाचे अनेक पैलू आहेत. त्यामध्ये पंरपरावादी, उदारमतवादी, परिवर्तनवादी, मार्क्सवादी, समाजवादी इत्यादी हे सिध्दांत आपल्याला स्त्रियांच्या समस्ये कडे घेऊन जातात. स्त्रीसमस्येचे निराकरण व विश्लेषण करण्यासाठी स्त्रीवादाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. उदा. हुंडा पध्दत, परंपरागत चालत आलेल्या रूढी नष्ट करण्यासाठी प्रत्यक्ष कृती करणे आवश्यक आहे. एप्रिल 1981 मध्ये मुंबईत 'महिला अध्ययन राष्ट्रीय संमेलन' आयोजित केले होते. यामध्ये भारतातील सर्व ठिकाणाहून मोठा प्रमाणात स्त्रिया सहभागी झाल्या व तेथेच 'All India Women Studies' ची स्थापना करण्यांत आली. या नंतर भारतातील सर्व विद्यापीठांमध्ये स्त्री अभ्यास केंद्र असावे असे युजीसीने मांडले. त्यानुसार आज भारतातील विद्यापीठांमध्ये स्त्री अभ्यासकेंद्र स्थापन करण्यांत आलेली आहेत. शिक्षण व सामाजिक कार्यातील सहभाग ही स्त्रियांची प्राथमिक गरज असल्याची जाणीव होऊन आज स्त्रिया अनेक क्षेत्रात उदा. शिक्षण, विज्ञान, उद्योग, राजकारण इत्यादी क्षेत्रात मोठया पदांवर चमकताना दिसतात. उदा. इंदिरा गांधी, प्रतिभा पाटिल, मायावती, बेनझीर भुट्टो, कल्पना चावला, सुनिता विल्यम इत्यादी. परंतू राजकारणात काही स्त्रियांचाच सहभाग दिसून येतो कारण येथे सुध्दा सत्ता व शोषणाला स्त्री बळी पडत आहे. स्त्रियांसाठी 50% आरक्षण आजही पुरुष प्रधान समाजव्यवस्थेला मान्य होत नाही. स्त्री समस्यांचा अभ्यास करताना सुरूवाती पासून उच्चवर्णीय स्त्रीलाच केंद्रस्थानी मानून अभ्यास केला जात होता व यामुळे कनिष्ठवर्गीय स्त्री दुर्लक्षीतच राहिली. परंतू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे दलित स्त्री विचार करू लागली, बोलू लागली. अगदी हळू हळू कां होईना पण दलित स्त्री ख—या अर्थाने स्वतंत्र होण्याची प्रकिया सुरू झाली.

स्त्रीवाद हा स्त्रियांपुरताच विषय राहिलेला नसून पुरूष अभ्यासकही स्त्रीवादी भूमिका घेऊन लेखन करीत आहे. आजच्या स्त्रीने फक्त घरापुरती आपली क्षमता खर्च करणे ही घोर विवंचना आहे याचा साक्षात्कार होणे व त्यामुळे स्वतःकडे व जगाकडे पाहण्याची दृष्टीच बदलणे ही स्त्रीवादाची खरी बैठक आहे. शरीरापलीकडचे मानवी कार्य, अरूंद भिंतीपलिकडचे असलेले जग आणि भविष्याला आकार देण्यात असलेला कृतीशील सहभाग यासाठी स्त्रीला प्रवृत्त करणे हे स्त्रीवादाचे मुख्य कार्य आहे.

20 व्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रीवादी चळवळीला अधिक गती आली. सिमान दि बोव्हा यांनी 'दि सेकंड सेक्स' या ग्रंथातून स्त्री ही जन्मतः स्त्री नसते तर तीला संपूर्ण समाज व्यवस्था स्त्री म्हणून घडविते. असा विचार मांडला याचाच अर्थ स्त्रीच्या मागासलेपणाचे शोषणाचे रहस्य स्त्री जातीत आहे हे स्पष्ट झाले. 1960 नंतर बोव्हा यांच्या ग्रंथाने स्त्रीवादी साहित्य चळवळींना वैचारीक अधिष्ठान प्राप्त करून दिले. स्त्रीच्या वाटयाला आलेले दुय्यम स्थान संपुष्टात आणून समाजात सक्ष ममाणूस म्हणून जगण्याचा हक्क स्त्रीला मिळाला पाहिजे असे प्रतिपादन केले. 1975 ते 1985 या दशकात भारतात नव्हे तर जागतिक पातळीवर मोठया प्रमाणावर महिला विकास योजना हाती घेण्यात आल्या. उत्तरोत्तर स्त्री विकासाचा आलेख वेगाने चढत गेलेला दिसून येतो. भारतात बचत गटापासून ते 50% आरक्षणापर्यंत स्त्री प्रगतीचे घोडदौडच सुरू आहे. विद्यापीठीय स्त्री

अभ्यासकेंद्र ते राज्य व केंद्रस्तरीय महिला आयोगापर्यंत स्त्री जागरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. जीवनाची सर्वच क्षेत्रे स्त्रियांनी व्यापलेली आहेत.

मॅगसेसे पुरस्कार विजेत्या किरण बेदी किंवा अवकाश भरारी मारणारी कल्पना चावला यांनी भारताची मान उंचावण्यात मोलाची भर घातली आहे. खेळाच्या क्षेत्रात सानिया मिर्झा (टेनिस), सायना नेहवाल (बॅडमिंटन), मेरी कोम (बॉक्सींग) यांनी जगात आपला ठसा उमटवलेला आहे. कृष्णा पाटिल, कविता राऊत, तेजस्विनी सावंत या महाराष्ट्र कन्यांनी तर आपल्या देशाचे नाव उज्वल केले आहे. सामाजिक कार्यात मदर तेरेसा, नर्मदा आंदोलनाच्या मेघा पाटकर व अनाथांसाठी कार्य करणा–या सिंधूताई सपकाळ, विजयाताई पटवर्धन, स्त्री मुक्ती आंदोलनाच्या नेत्या विजयाताई चौक, कुष्ठरोग्यांसाठी आनंदवन येथे काम करणा–या मिनाताई आमटे यांनी बहुमोल अशी कामगिरी केलेली आहे.

भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान होण्याचा मान श्रीमती इंदिरा गांधीनी मिळवला होता. तर 21 व्या शतकाच्या पहिल्या दशकात भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती होण्याचा मान प्रतिभाताई पाटिल यांनी मिळविला. मिलेट्रीत सैन्य भरतीपासून ते सर्वोच्च पदापर्यंतची सर्व कार्यक्षेत्रे व्यापून स्त्रीवादी चळवळीच्या सामाजिक बाजूचा चढता आलेख सिध्द करून दाखविलेला आहे. श्रीलंकेच्या अध्यक्षा सिरिमाओ बंदारनायके जगातील पहिल्या स्त्री अध्यक्षा होत. बांगला देशाच्या पंतप्रधान बेगम खालिदा, अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्री हिलरी क्लिंटन, श्रीलंकेच्या अध्यक्षा चंद्रिका कुमारतुंगा यांनीही जागतिक स्तरावर मौलिक कामगिरी केलेली आहे.

### *निष्कर्ष :–*

स्त्रीवादी चळवळीच्या सामाजिक बाजूचा आलेख पाहिला तर खरोखरच वेगाने चढत गेलेला दिसून येईल. स्त्रीवादी चळवळीचे साधारण चार कालखंडाचा विचार करावा लागतो. इतिहासाचे तीन कालखंडच मानले जातात. प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक आणि अत्याधुनिक. 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजे इ. स. 1960 पासून स्त्रीवादी चळवळीची चक्रे वेगाने फिरू लागली आणि 1975 हे वर्श जागतिक स्त्री वर्ष घोषित करण्यांत आले. पुढील 30–35 वर्षाच्या कालखंडात स्त्री ही केंद्रस्थानी राहीली. 1975 ते 1985 या दशकात भारतातच नव्हे तर जागतिक पातळीवर मोठया प्रमाणावर महिला विकास योजना हाती घेण्यांत आल्या. भारतात बचतगटापासून ते 50% आरक्षण हे स्त्रीवादी चळवळीची सामाजिक बाजू भक्कम नाही कां ?जीवनाची सर्वच क्षेत्रे स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाने सिध्द करून दाखविलले आहे. त्यांचे कार्य पुढे असेच चालू रहावे. त्यांच्या यशस्वी कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा.

........................................................................................................................

1प्रतिभा इंगोले, 'लोक संस्कृती आणि स्त्री जीवन', दिलीपराज प्रकाशन पुणे आवृत्ती 15 एप्रिल 2003 पृ. 18

2डॉ. अश्विनी धोगडे, 'स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजक' दिलीपराज प्रकाशन पुणे आवृत्ती 30 जानेवारी 1993 पृ.6

3संपा. स्वाती कर्वे, 'स्त्री विकासाच्या पाऊलखुणा' प्रतिमा प्रकाशन पृ. 29

4डॉ. प्रतिभा अहिरे, 'समाजशास्त्रीय परिपेक्षातून स्त्रियांची आत्मकथने' कैलास पब्लिकेशन्स पृ. 39

5डॉ. अश्विनी धोगडे, 'स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजक' दिलीपराज प्रकाशन पुणे आवृत्ती 30 जानेवारी 1993 पृ. 9

6 प्रतिभा रानडे, 'स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊल खुणा : स्त्री प्रश्नांची चर्चा, 19 वे शतक' पॉप्युलर प्रकाशन 1991–92 पृ. 380

### *संदर्भ ग्रंथ :–*

1.'स्त्री विकासाच्या पाऊलखुणा' – संपा. स्वाती कर्वे
2.'स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजक' – डॉ. अश्विनी धोंगडे
3.'स्त्री–मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा स्त्री प्रश्नांची चर्चा 18 वे शतक'– प्रतिभा रानडे
4.'स्त्री–प्रश्नाची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने' – विद्युत भागवत
5.'स्त्रीवाद–'पंपा, सुमती लांडे
6.'समाजशास्त्रीय परिपेक्षातून स्त्रियांची आत्मकथने–' डॉ. प्रतिभा अहिरे
7.'लोकसंस्कृती आणि स्त्री जीवन' – प्रतिभा इंगोले

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net